चाकण-तळेगाव वाहतूक आता वेगवान

महामार्गावरील सर्वाधिक कोंडीच्या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उपाययोजना

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

पुणे : तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्गावर सर्वाधिक कोंडी होणारी पाच ठिकाणे आहेत. या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. या ठिकाणी महामार्गाची रुंदी १० वरून १५ मीटर करण्यात येणार आहे. यामुळे या ठिकाणी वाहनांची गर्दी होऊन निर्माण होणारी कोंडीची समस्या सुटण्यास मदत होणार आहे. हे काम पुढील महिन्याच्या अखेरीस पूर्ण करण्याचे नियोजन असून, त्यानंतर तळेगाव ते चाकण वाहतुकीला गती मिळणार आहे.

तळेगाव-चाकण-शिक्रापूर हा ५४ किलोमीटरचा महामार्ग आहे. हा महामार्ग दुपदरी असून, तळेगाव आणि चाकण या औद्योगिक क्षेत्रातील वाहतुकीसाठी हा मुख्य मार्ग आहे. यावरून मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची वाहतूक होते.

कोंडीची ठिकाणे

- खालुंब्रे
- खालुंब्रे घाट
- एचपी चौक
- म्हाडा सोसायटी
- खराबवाडी

तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्ग

एकूण लांबी - ५४ किलोमीटर

वाहतूक क्षमता - दररोज १० हजार प्रवासी मोटारी

सध्याची वाहतूक - दररोज ३९ हजार १९७ प्रवासी मोटारी

तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्गाच्या दुरुस्तीचे काम पूर्ण होत आले आहे. आता या महामार्गाचे रुंदीकरण हाती घेण्यात येणार आहे. या महामार्गावर पाच ठिकाणी सर्वाधिक वाहतूककोंडी होते. त्या ठिकाणी महामार्गाचे रुंदीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे. हे काम ऑक्टोबरअखेरपर्यंत पूर्ण होईल. याचबरोबर महामार्गावर झालेली अतिक्रमणे हटविण्याची मोहीमही हाती घेण्यात आली आहे.

– **प्रशांत पंडित,** कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

त्यामुळे आधीच अरुंद असलेल्या या महामार्गावर कोंडी होते. या महामार्गाची दुरवस्था झाल्याने त्यांच्या दुरुस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने हाती घेतले आहे. विभागाकडून या महामार्गावरील खड्डे बुजविण्यासह विविध ठिकाणी खराब झालेला भाग दुरुस्त करण्यात आला आहे. याचबरोबर रस्त्याच्या कडेचा भाग मुरूमाने भरून घेऊन तो व्यवस्थित करण्यात आला आहे.

रस्त्यांची दुरुस्ती आणि डांबरीकरणानंतर आता सार्वजनिक बांधकाम विभागाने शक्य असेल तिथे १० मीटर महामार्गाचे रुंदीकरण करून तो १५ मीटर करण्याचे पाऊल उचलले आहे. या महामार्गावर वाहतूककोंडीची पाच प्रमुख ठिकाणे आहेत. त्यात खालुंब्रे, खालुंब्रे घाट, एचपी चौक, म्हाडा सोसायटी, खराबवाडी यांचा समावेश आहे.

या ठिकाणी पाचशे मीटर अंतरात महामार्ग १० वरून १५ मीटर रुंद करण्यात येणार आहे. तसेच, शक्य असेल तिथेही महामार्गाचे रुंदीकरण करण्यात येईल. हे काम ऑक्टोबरअखेरीस पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या महामार्गाच्या दुरुस्तीसह रुंदीकरणासाठी ४३ कोटी रुपयांची निविदा काढण्यात आली आहे, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाने दिली.

दीपक दंडवते यांचे निधन

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : रंगभूमीवरील विविध नाटकांमध्ये लहान-मोठ्या भूमिका साकारण्यापासून ते भरत नाट्य मंदिरासाठी पडद्यामागील कलाकार म्हणून अर्धशतकाहून अधिक काळ कार्यरत दीपक शंकर दंडवते (वय ७२) यांचे आकस्मिक निधन झाले. ते अविवाहित होते.

भरत नाट्य संशोधन मंदिराच्या बालनाट्यांतून भूमिका करून १९६४ पासून दीपक यांच्या कारकिर्दीची सुरुवात झाली. संस्थेचे बाबूराव विजापुरे आणि कृष्णदेव मुळगुंद यांनी दिलेल्या नाट्य संस्कारांतून त्यांनी बालनाट्य ते संगीत नाटकातून भूमिका तर केल्याच, परंतु संस्थेच्या नियामक मंडळ, कार्यकारी मंडळ, नाट्यगृह समितीवरही काम केले. १९७२ पासून व्यावसायिक रंगभूमीवर त्यांना कामे मिळू लागली. विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले होते. प्रकाशन व्यवसायामध्ये एस. के. बेलवलकर यांच्या 'गुलमोहर', ह. मो. मराठे यांच्या 'किस्त्रीम' आणि माधुरी वैद्य यांच्या श्रीवत्स प्रकाशनासाठी त्यांनी काम केले.

पुणे, पिंपरीत जोरदार पाऊस

पुणे/पिंपरी : पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये मंगळवारी सायंकाळी जोरदार पावसाने झोडपले. विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह पाऊस झाला. सुमारे दीड तास झालेल्या या पावसाने नागरिकांची तारांबळ उडाली.

पावसामुळे रस्त्यात ठिकठिकाणी पाणी साचले. काही भागात विद्युत पुरवठाही खंडित झाला.

औद्योगिक परिसरातील कारखान्यांमधील कामगार घरी सुटण्याच्या वेळेसच पाऊस सुरू झाल्याने चाकरमान्यांची एकच तारांबळ उडाली. पावसामुळे काही वेळ वाहतूक विस्कळीत झाली. पावसाने सखल भागात पाणी साचले होते. त्यामुळे वाहने चालवताना वाहनचालकांना कसरत करावी लागत होती.

मुलाखतीसह निवड प्रकारात १० हजार पदे

शिक्षक भरती प्रक्रियेसाठी आठवडाभरात शिफारस

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : राज्यातील शिक्षक भरती प्रक्रियेत पवित्र संकेतस्थळाद्वारे मुलाखतीसह निवड या प्रकारात पात्र उमेदवारांची शिफारस करण्यात येणार आहे. या प्रकारात १०,३४७ पदे उपलब्ध होणार असून, येत्या आठवडाभरातच पात्र उमेदवारांची मुलाखतींसाठी शिफारस करण्याचे नियोजन शिक्षण विभागाने केले आहे.

मुलाखतीसाठी केवळ १० गुण

'मुलाखतीसह निवड प्रकाराअंतर्गत एकूण १०० गुणांवर उमेदवारांची पात्रता ठरवली जाणार आहे. त्यात शैक्षणिक आणि व्यावसायिक पात्रता, टीईटी यासाठीचे ९० गुण स्वयंचलित पद्धतीने निश्चित होतील. तर, खासगी अनुदानित शाळा व्यवस्थापनांना मुलाखतीसाठी १० गुण असतील. उमेदवारांना प्राधान्यक्रम, त्यांच्या प्रवर्गातील आधीच्या उमेदवारांचीही माहिती पाहता येणार आहे. त्यामुळे मुलाखतीसह निवड या प्रकाराअंतर्गत निवड प्रक्रिया काटेकोर पद्धतीने राबवली जाणार आहे,' असे सचिंद्र प्रताप सिंह यांनी नमूद केले.

शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी याबाबतची माहिती दिली. पवित्र संकेतस्थळाद्वारे राबविण्यात येत असलेल्या निवड प्रक्रियेत मुलाखतीविना निवड या प्रकारात आतापर्यंत १७ हजार ५०९ उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे.

त्यात नियमित फेरीद्वारे १३ हजार ११९, समांतर आरक्षणातील रिक्त राहिलेल्या जागांसाठी रूपांतरित फेरी राबवून ४ हजार ३९० उमेदवारांची शिफारस करण्यात आली. त्यानंतर २२४५ जागा अद्यापही रिक्त आहेत. मात्र, त्यासाठी उमेदवारांच्या उपलब्धतेचा प्रश्न आहे.

खासगी अनुदानित शाळांतही मोठ्या प्रमाणात रिक्त जागा असल्याने आता मुलाखतीसह निवड प्रकारासाठीची प्रक्रिया प्राधान्याने राबविण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. राज्यभरातील उमेदवारांचेही मुलाखतीसह निवडीकडे लक्ष लागले आहे.

डेंग्यू, चिकनगुनियामध्ये पुणे राज्यात दुसरे

सर्वाधिक रुग्ण पालघर जिल्ह्यात, महापालिका क्षेत्रात मुंबईत सर्वाधिक रुग्ण

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : राज्यात डेंग्यूचे सर्वाधिक २६२ रुग्ण पालघर जिल्ह्यात आढळले असून, त्या पाठोपाठ पुणे २०५, धुळे १६८, लातूर १४० आणि रायगडमध्ये १२५ रुग्ण आहेत. सर्वांत कमी १२ रुग्ण गडचिरोलीमध्ये आहेत. पालघरमध्ये मृत्यूची नोंद नाही, तर धुळे, जळगाव, परभणी आणि गडचिरोली येथे प्रत्येकी एका मृत्यूची नोंद आहे. महाराष्ट्र राज्य आरोग्य विभागाच्या एक जानेवारी ते १४ सप्टेंबर या कालावधीतील आकडेवारीवरून ही माहिती समोर आली आहे.

महापालिका क्षेत्रात डेंग्यूचे सर्वाधिक २,६५६ रुग्ण बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रात असून, या ठिकाणी नऊ महिन्यांत पाच मृत्यू झाले आहेत. पुणे महापालिकेत १९०९, ठाणे ५९९, पनवेल २६२, पिंपरी-चिंचवड १६०, धुळे १३८, नाशिक १३४ आणि कोल्हापूरमध्ये १२९ रुग्ण आहेत. सर्वांत कमी ११३ रुग्ण मालेगावमध्ये आहे. पुणे महापालिका क्षेत्रात मृत्यूची नोंद झालेली नाही.

चिकुनगुनियाच्या रुग्णसंख्येतही पालघर जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजे ३०४ रुग्ण आहेत. या खालोखाल पुण्यात १५०, लातूरमध्ये ७६ आणि धुळ्यात सर्वांत कमी म्हणजे ६५ रुग्ण आढळले आहेत. महापालिकांमध्ये पुणे ९९ रुग्णांसह पुढे असून, बृहन्मुंबईत ८०, अकोल्यात ५४ आणि कोल्हापुरात ३९ रुग्ण आहेत. चिकुनगुनियामुळे मृत्यूची नोंद झालेली नाही नाही.

काय काळजी घ्यावी ?

- नागरिकांनी घराभोवती पाणी साचू न देणे
- पाण्याची भांडी झाकून ठेवणे
- दारे-खिडक्यांना जाळ्या बसवणे आणि मच्छरदाणीचा वापर करणे
- आठवड्यातून किमान दहा मिनिटे घर व परिसरातील पाणीसाठ्यांची तपासणी करणे

दरम्यान, डेंग्यू आणि चिकुनगुनियाचा प्रसार करणाऱ्या एडीस डासांच्या प्रजननासाठी पावसामुळे निर्माण होणारे पाणी साचण्याचे स्रोत पोषक ठरत आहेत.

घरातील कुंड्यांखालील जागा, फुलदाण्या, कुलर, फ्रिजच्या ट्रे, टायर, बांधकामाची ठिकाणे, पाण्याची भांडी आणि इतर निरुपयोगी वस्तूंमध्ये डासांच्या अळ्या आढळू शकतात. असे प्रशासनाने सांगितले आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने प्रशासकीय यंत्रणा सज्ज ठेवण्यासोबतच नियमित घरभेटी आणि सर्वेक्षण, कीटकशास्त्रीय पाहणी, डासोत्पत्तीस्थळे नष्ट करणे, आवश्यकतेनुसार कीटकनाशक फवारणी व अळीनाशकांचा वापर आणि गप्पी माशांद्वारे जैविक नियंत्रण अशा उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

दोन कोटींची फसवणूक; सायबर चोरांना अटक

पुणे : खासगी कंपनीचा मालक बोलत असल्याची बतावणी करून लेखा विभागातील व्यवस्थापकाला वेगवेगळ्या बँक खात्यांवर एक कोटी ९५ लाख रुपयांची रोकड भरण्यास सांगून फसवणूक करणाऱ्या सायबर चोरट्यांना पोलिसांनी अटक केली. या प्रकरणात पाच चोरट्यांना अटक करण्यात आली आहे. एका आरोपीने चीनमध्ये संधान बांधल्याचे तपासात उघडकीस आले आहे.

शहरातील एका खासगी कंपनीतील लेखा विभागातील व्यवस्थापकाच्या मोबाइल क्रमांकावर सायबर चोरट्यांनी समाज माध्यमातील संपर्क सुविधेचा वापर करून संपर्क साधला. कंपनीचा मालक बोलत असल्याची बतावणी चोरट्यांनी केली होती. तातडीने एक कोटी ९५ लाख रुपयांची रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यात भरण्यास सांगण्यात आले होते. लेखा विभागातील व्यवस्थापकांच्या लक्षात हा प्रकार आला नाही. त्यांनी तातडीने ही रक्कम वेगवेगळ्या खात्यात जमा केली.

फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर सायबर पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास सायबर पोलीस ठाण्याच्या पथकाकडून करण्यात येत होता.

शिर्डी विमानतळावर 'चितळे बंधू'चे आउटलेट

पुणे : चितळे बंधू मिठाईवाले यांच्या शिर्डी विमानतळावरील नवीन आउटलेटचे उद्घाटन भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष खासदार सुजय विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.या वेळी चितळे बंधूंचे व्यवस्थापकीय भागीदार इंद्रनील चितळे उपस्थित होते. शिर्डी विमानतळावर सुरू झालेल्या या नवीन आउटलेटमध्ये देशभरातून येणाऱ्या भाविक आणि प्रवाशांना चितळे बंधूंच्या उत्पादनांचा आस्वाद घेता येईल.या वेळी बोलताना इंद्रनील चितळे म्हणाले, 'शिर्डी हे देशभरातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. देशाच्या विविध भागांतून शिर्डीला येणाऱ्या भाविकांना आणि प्रवाशांना चितळे बंधूंची उत्पादने सहज उपलब्ध करून देता येणार आहेत, ही आमच्यासाठी समाधानाची बाब आहे. भविष्यात देशातील विविध विमानतळांवर 'चितळे बंधूं'ची उपस्थिती वाढवण्याचा आमचा मानस आहे.'

केनरा बैंक Canara Bank

वसुली विभाग, क्षेत्रीय कार्यालय पुणे : ३ रा मजला, फोर्थ डायमेंशन बिल्डींग, सीटीएस नं. १३६, गुळवणी महाराज रोड, पांडुरंग कॉलनी, एरंडवणे, पुणे-४११००४

शुध्दीपत्रक

दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी दै. लोकसत्ता पुणे मध्ये प्रसिध्द झालेल्या मागणी सूचनेत अ.क्र. २ मधील श्री. शरद बापूसाहेब कादे्र आणि श्री. अक्षय शरद कादे्र या खात्यासंबधातील शाखेचे नाव पुणे एरंडवणा (१५३३२) ऐवजी **पुणे डेक्कन जिमखाना (००३८२)** असे वाचावे. इतर मजकुरात बदल नाही.

सही/- अधिकृत अधिकारी,

ॲक्सिस बँक लि. **शाखा कार्यालय :** ॲक्सिस बँक लि., स्टर्लिंग प्लाझा, तळमजला, साई सेवा पेट्रोल पंप समोर, जे.एम.रोड, पुणे-४११००४.

नोंदणीकृत कार्यालय : ॲक्सिस बँक लि., त्रिशूल, ३रा मजला, समर्थेश्वर मंदिरासमोर, लॉ गार्डन, एलिस ब्रिज, अहमदाबाद - ३८०००६.

तारण ठेवलेल्या मालमत्तेतील जंगम वस्तू काढून टाकणे

प्रति, **दि.२३/०९/२०२६**

१) छल्ला ज्योती रेड्डी

स्व. छल्ला श्रीनिवास अनंत रेड्डी यांचे कायदेशीर वारस तसेच सह-अर्जदार

रा. द्वारा. राहुल शेवडे, प्लॉट क्र.२१०, सेक्टर. ४, संत नगर, पीसीएनटीडीए, स्पाईन रोड, मोशी प्राधिकरण, मोशी, पुणे-४११०२६ **तसेच :** फ्लॅट क्र.१३, बिल्डिंग डी २, केंद्रीय विहार, पुणे नाशिक रोड, पीसीएनटीडीए सोसायटी ४, मोशी, पुणे-४१२१०५ **तसेच :** प्लॉट क्र.१७, सर्वे क्र.७४ आणि ८०, ममता चौकाजवळ, दिघी, हवेली, पुणे-४११०१५ **तसेच :** ३-४, कोज्जवनमपल्ले, नवाबपेट मंडळ, रंगारेड्डी, जि.तेलंगणा-५०११०१.

प्रिय महोदय/मॅडम,

कृपया नोंद घ्यावी की, तारण ठेवलेली मालमत्ता प्लॉट नं.१७ आणि त्यावरील बांधकाम, सर्वे नं. ७४ आणि ८०, ममता चौक जवळ, दिघी, ता.हवेली, जि.पुणे, ही सरफेसी कायदा २००२ च्या लागू तरतुदींनुसार दि.०७/०१/२०२५ रोजी ॲक्सिस बँक लिमिटेडच्या प्रत्यक्ष ताब्यात घेण्यात आली होती. त्यानंतर, सदर तारण ठेवलेली मालमत्ता दि.२६/०५/२०२६ रोजी आयोजित ई-लिलावाद्वारे विकण्यात आली आहे.

असे निदर्शनास आले आहे की, तुमच्या मालकीच्या असल्याचा दावा केलेल्या काही जंगम वस्तू, सामान, फर्निचर, फिक्स्चर आणि/किंवा इतर वस्तू अद्यापही सदर तारण ठेवलेल्या मालमत्तेमध्ये आहेत.

या सूचनेच्या तारखेपासून **सात (७) दिवसांच्या आत,** तारण ठेवलेल्या मालमत्तेमधून अशा सर्व जंगम वस्तू तुमच्या स्वतःच्या खर्चाने, जोखमीवर आणि जबाबदारीवर काढून घेऊन त्यांचा ताबा घ्यावा, असे तुम्हाला याद्वारे सांगण्यात येत आहे.

कृपया नोंद घ्यावी की, उपरोक्त सात दिवसांचा कालावधी संपल्यानंतरही जर जंगम वस्तू हलवल्या नाहीत, तर बँक तुम्हाला कोणताही पुढील संदर्भ किंवा सूचना न देता, अशा वस्तू काढून टाकण्यास, त्यांची विल्हेवाट लावण्यास, लिलाव करण्यास, सोडून देण्यास किंवा तिला योग्य वाटेल त्या रीतीने इतर कोणत्याही प्रकारे व्यवहार करण्यास स्वतंत्र असेल.

अशा कोणत्याही जंगम वस्तू हलवण्यापूर्वी, हलवताना किंवा हलवल्यानंतर होणारे कोणतेही नुकसान, हानी, बिघाड, नाश किंवा अवमूल्यन यासाठी बँक जबाबदार किंवा उत्तरदायी राहणार नाही. अशा जंगम वस्तूंशी संबंधित कोणताही धोका केवळ कर्जदार, सह-कर्जदार आणि/किंवा त्यावर मालकी हक्क सांगणाऱ्या व्यक्तीकडेच राहील.

याव्यतिरिक्त, अशा जंगम वस्तू काढून टाकणे, साठवणूक करणे, हाताळणी करणे किंवा त्यांची विल्हेवाट लावणे यासाठी बँकेला आलेला कोणताही खर्च कर्जदार आणि सह-कर्जदार यांच्याकडून संयुक्तपणे आणि स्वतंत्रपणे वसूल केला जाईल.

ही सूचना बँकेचे उपलब्ध असलेले हक्क आणि उपाययोजना अबाधित ठेवून जारी करण्यात येत आहे.

अधिकृत अधिकारी, ॲक्सिस बँक लिमिटेड

मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड

सीआयएन - यू65923एमएच2013पीएलसी248741

नोंदणीकृत कार्यालय: मोतीलाल ओसवाल टॉवर, रहिमतुल्ला सयानी रोड, परळ एसटी डेपोसमोर, प्रभादेवी, मुंबई - 400 025, **सीएस:** 8291889898 **वेबसाईट :** www.motilaloswalhf.com, **ईमेल :** hfquery@motilaloswal.com

जाहीर सूचना

मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड ("एमओएचएफएल") (आधी "अस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड" म्हणून ओळखळे जाणारे) याद्वारे कर्जदारांना सूचना देत आहे, नामे, कीर्ती सुनील भोगशेट्टी आणि 0 (यापुढे एकत्रितपणे "कर्जदार" म्हणून संबोधले जाईल) कर्ज खाते क्र. एलएक्सएमओएसओएलएपीयू5522-230667702 त्यांनी वरील निर्देशित तारण मालमत्तेतून, म्हणजेच ("जुना अ.क्र. 340, नवीन अ.क्र. 100 प्लॉट क्र. 147 उद्धव नगर भाग -2 फौजी फ्लोअर मिल, स्वामी विवेकानंद नगरजवळ एरिया मजरेवाडी ता-उत्तर सोलापूर जि.- सोलापूर 00 फौजी फ्लोअर मिलजवळ 413004 सोलापूर महाराष्ट्र") "स्थित असलेल्या मालमत्तेचा ते सर्व भाग आणि पार्सल", येथून त्यांच्या वैयक्तिक वस्तू/सामान काढून घ्यावे, सरफेसी कायदा, 2002 च्या तरतुदींचे योग्य पालन करून, 7 दिवसांच्या कालावधीत, ज्याचा भौतिक ताबा एमओएचएफएल यांच्याकडे आहे. कर्जदारांना पुढे कळविण्यात येते की, जर कर्जदारांनी 7 दिवसांच्या विहित कालावधीत सदर तारण मालमत्तेतून त्यांच्या वैयक्तिक वस्तू/सामान काढले नाही, तर एमओएचएफएल हे कायद्यानुसार, सदर वैयक्तिक वस्तू/सामानाची विल्हेवाट लावण्यास पात्र असेल आणि ते त्यांच्या अधिकारात असेल; यामध्ये इतर गोष्टींबरोबरच, जाहीर लिलाव आयोजित करणे किंवा अशी मालमत्ता खरेदी करण्यास इच्छुक असलेल्या पक्षांकडून दरपत्रके मागवणे यांचा समावेश आहे.

दिनांक: 23.09.2026 **मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड**

ठिकाण: महाराष्ट्र **भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.** **सही/-अधिकृत स्वाक्षरीकर्ता**

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

परिशिष्ट - IV-A - अचल मालमत्तेची ई-लिलाव-जाहीर विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

नोंदणीकृत कार्यालय :- 9वा मजला, अंतरीक्ष भवन, 22 कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली - 110001, फोन्स :- 011-23357171, 23357172, 23705414, वेब. :- www.pnbhousing.com

शाखा कोल्हापूर : 401/402, चौथा मजला, मातोश्री प्लाझा, व्हीनस कॉर्नर, शाहूपुरी, कोल्हापूर, महाराष्ट्र - 416001.

शाखा पुणे : युनिट क्र. 601, 602, 603, 604, 605, 606, 6वा मजला, प्राईड हॉटेल कॅ न्क्लेव्हच्या मागे, शिवाजीनगर, पुणे, महाराष्ट्र - 411005.

याद्वारे खाली स्तंभ क्र. - ए मध्ये नमूद कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भारग्रस्त असलेल्या खाली स्तंभ - डी मध्ये नमूद अचल मालमत्तेचा मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनको च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी रचनात्मक / प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून (स्तंभ इ सी मध्ये नमूद केल्यानुसार) त्यांची **"जशी आहे जेथे आहे"** आणि **"जशी आहे जे काही आहे"** आणि **"तेथे जे काही आहे"** तत्त्वावर खाली नमूद तपशिलानुसार विक्री करण्यात येईल. याद्वारे ही सूचना सद्य दिनांकास सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम इ 8(6) व 9 अंतर्गत स्तंभ क्र. ए मध्ये नमूद करण्यात आलेल्या कर्जदार / गहाणदार / कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), संबंधित कर्जदार / गहाणदारांच्या (मयत झाले असल्यास) मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक, वारसदार, अभिहस्तांकिती यांना देऊ करण्यात येत आहे. विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनकोच्या वेबसाईटला www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.

कर्ज क्र., कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार / कायदेशीर वारस यांचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व दिनांक (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	तारण मालमत्तेचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (आ. कि.) (ई)	बयाणा रक्कम (आ. कि. च्या 10%) (एफ)	बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहणीचा दिनांक व वेळ (आय)	लिलावाचा दिनांक व वेळ (जे)	असल्यास, ज्ञात बोजे / न्यायालयीन कज्जे (के)
HOU/KOP/0618/545464 आणि **NHL/KOP/0219/653316,** बाळू तुळशीराम जाधव / राणी बाळू जाधव, शाखा : कोल्हापूर	रु. 73,30,409.69 आणि 30-09-2023	प्रत्यक्ष ताबा	फ्लॅट क्र. 301, तिसरा मजला, ओम हेरिटेज अपार्टमेंट, प्लॉट क्र. 57 आर एस क्र. 1076/1, ए वॉर्ड, साने गुरुजी वसाहत, कोल्हापूर, महाराष्ट्र, 416012, भारत.	**रु. 48,26,000**	रु. 4,82,600	22/10/2026	रु. 10,000	13-10-2026 दु. 12:00 ते दु. 04:00	**23-10-2026 दु. 2 ते दु. 03:00**	ज्ञात नाही
00156660001696 आणि **00156700002452** आणि **NHL/PUN/0315/214075,** माणिक अमृत बिहाणी / सतीश भगीरथ भुतडा / रोहित अमृत बिहाणी / रोहित सर्व्हिस स्टेशन, शाखा : पुणे	रु. 2.52.97.396.91 आणि 09-12-2022	प्रत्यक्ष ताबा	फ्लॅट क्र. 101 आणि 102, पहिला मजला, आसमंत, सीटीएस क्र. 933ए/1, प्लॉट क्र. 317ए/1, हॉटेल अंबेसिडरच्या मागे, शिवाजीनगर, पुणे, महाराष्ट्र, 411005.	**रु. 3,03,03,000**	रु. 30,30,300	22/10/2026	रु. 2,00,000	16-10-2026 दु. 12:00 ते दु. 04:00	**23-10-2026 दु. 2 ते दु. 03:00**	ज्ञात नाही

***सोबत भरण्याच्या व / वा वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू असेल त्यानुसार वार्षिक 18% दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार वर स्तंभ - के मध्ये जाहीर केलेल्या माहितीशिवाय वर नमूद अचल / अनामत मत्तांच्या संदर्भात इतर कोणतेही बोजे / दावे नाहीत. याशिवाय असे कुठलेही बोजे असल्यास यशस्वी खरेदीदाराने / बोलीदाराने ते स्वतः भरावयाचे आहेत. संभाव्य खरेदीदार / बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वर नमूद बोज्यांची स्वतंत्रपणे चौकशी करावी. (1)** आज दिनांकास वर नमूद अचल मालमत्ता / अनामत मत्तांची विक्री करणे, त्यांची विल्हेवाट लावणे इ. पासून पीएनबीएचएफएल / पीएनबीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांना प्रतिबंध करणारा कोर्टाचा कोणताही हुकूम नाही आणि स्थितीचा उल्लेख स्तंभ क्र.- के मध्ये केला आहे. **(2)** संभाव्य खरेदीदारांनी / बोलीदारांनी आणि इच्छुकांनी स्तंभ - के मध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया / आदेश इ. मधील बाजूची स्वतंत्रपणे चौकशी करावी. यात पीएनबीएचएफएल यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तावेजांच्या मालकी हक्काचा समावेश आहे, परंतु ते तेथेपर्यंतचे मर्यादित नसून त्यांनी निविदा / बोली अर्ज सादर करण्याअगोदर किंवा प्रस्ताव देण्याअगोदर सर्व बाबतीत चौकशी करून घ्यावी. बोलीदाराने या लिलावाच्या अटी व शर्तींवर बोली फॉर्मसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. **(3)** कृपया लक्षात घ्यावे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(3) च्या अनुषंगाने बोलीदार / खरेदीदार विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम (जमा केलेली बयाणा रक्कम धरून) त्याच दिवशी किंवा फार तर पुढील कामकाजाच्या दिवशी सादर करण्यास बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(2) नुसार सुरक्षित धनकोस विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम प्राप्त झाल्यावरच विक्री बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री रकमेपैकी उर्वरित 75% रक्कम खरेदीदारास विक्रीच्या निश्चितीच्या पावतीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत जमा करावी लागेल अन्यथा अशा ठेवी चुकवल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्रीच्या पुष्टीकरण पत्रात नमूद केलेल्या 15 दिवसांच्या अनिवार्य कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून 15 दिवसांच्या आत विक्रीच्या मोबदल्याच्या रकमेचे काही भाग जप्त करेल आणि मालमत्ता / अनामत मत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. **(4) सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड हे प्राधिकृत अधिकाऱ्यांना ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीची प्रक्रिया राबविण्यास मदत करतील. ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय प्लॉट क्र. 68, तिसरा मजला, सेक्टर 44, गुडगाव, हरियाणा 122003, वेबसाइट - www.bankeauctions.com, मालमत्तेची तपासणी किंवा बोली दस्तऐवज मिळविण्याशी संबंधित कोणत्याही सहाय्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नासाठी किंवा नोंदणीसाठी, पीएनबीएचएफएल चे प्राधिकृत व्यक्ती - गणेश अंकुश / निलाक्षी पाटील, टोल फ्री क्र. : 1800 120 8800, ई-मेल : auction@pnbhousing.com, यांचेशी संपर्क साधावा किंवा www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.**

ठिकाण :- पुणे, दिनांक :- 23.09.2026 स्वा./- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

सार्वजनिक सूचना

{कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ६२(१)(अ) नुसार, कंपनी (शेअर कॅपिटल आणि डिबेंचर्स) नियम, २०१४ नुसार }

समभाग शेअर्सच्या राईट इश्यूबाबत (हक्क भाग जारी करण्याबाबत) सूचना

श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि. नोंदणीकृत कार्यालय - स.नं. १२/२, दुसरा मजला, मेघदूत बिल्डिंग, भारत पेट्रोल पंपाच्या मागे, जुना लोखंडी पुल रस्ता, हडपसर, पुणे, महाराष्ट्र, भारत, ४११०२८ येथे आहे.

सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनीने गुरूवार दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या बैठकीत, या उद्देशाने निश्चित केलेल्या रेकॉर्ड तारखेनुसार कंपनीच्या विद्यमान समभागधारकांना राईट्स इश्यू (हक्क भाग) द्वारे समभाग शेअर्स जारी करण्यास मान्यता दिली आहे.

हा राईट्स इश्यू कंपनी कायदा, २०१३ आणि त्याअंतर्गत केलेले लागू नियम, तसेच इतर लागू कायदे आणि नियमांच्या तरतुदीनुसार केला जात आहे.

राईट्स इश्यूच्या संक्षिप्त अटी खालीलप्रमाणे आहेत :-

- इश्यू आकार (Issue Size) : रुपये १,६४,६७,२०० , जे १,६४,६७२ समभाग शेअर्समध्ये विभागलेले आहेत.
- राईट्स पात्रता प्रमाण (Rights Entitlement Ratio) : धारण केलेल्या प्रत्येक १० (दहा) समभाग शेअर्समागे १ (एक) समभाग शेअर्स.
- प्रति समभाग शेअर्स दर्शनी मुल्य (Face Value) : ₹ १००/-
- प्रति समभाग शेअर्स इश्यू किंमत (Issue Price) : ₹ २००/-
- प्रति समभाग शेअर्स प्रिमियम (Premium) : ₹ १००/-
- रेकॉर्ड तारीख (Record Date) : १०/०९/२०२६
- ऑफर कालावधी (Offer Period) : २७ सप्टेंबर २०२६ ते १६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत
- इश्यूचा उद्देश (Purpose of the Issue) : सामान्य व्यावसायिक उद्देशांसाठी.

टीप :- या इश्यूअंतर्गत राईट्स तत्वावर दिल्या जाणाऱ्या समभाग शेअर्ससाठी, जर कोणत्याही पात्र समभाग शेअरधारकाची शेअरहोल्डींग १० समभाग शेअर्सपेक्षा कमी असेल, तर अशा पात्र समभाग शेअरधारकांच्या अपूर्णांकातील (fractional) राईट्स पात्रतेची गणना केली जाणार नाही. तथापि, ज्या पात्र शेअरधारकांच्या अपूर्णांकातील पात्रतेकडे दुर्लक्ष केले गेले आहे , त्यांना प्रत्येकी एक अतिरिक्त राईट्स समभाग शेअरच्या वाटपामध्ये (Allotment) प्राधान्य दिले जाईल; जर अशा पात्र शेअरधारकांनी त्यांच्या राईट्स पात्रतेव्यतिरिक्त अतिरिक्त राईट्स इक्विटी शेअर्ससाठी अर्ज केला असेल, आणि हा लाभ राईट्स पात्रतेच्या वाटपानंतर या इश्यूमध्ये इक्विटी शेअर्स उपलब्ध असण्याच्या अधीन राहील.

तसेच सविस्तर ऑफर लेटर (Letter of Offer) योग्य वेळी सर्व पात्र शेअरधाकांना पाठवले जाईल आणि ते कंपनीच्या वेबसाइटवर तसेच इतर लागू प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असेल.

अधिक माहितीसाठी, भागधारक खालील व्यक्तींशी संपर्क साधू शकतात :-

- अधिकृत व्यक्तीचे नाव : **प्रतीक नाईकवडी**
- इमेल आयडी : sharesmskl@gmail.com
- संपर्क क्रमांक : ८२६१ ०५८ ७७१.

श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लिमिटेडच्या वतीने

स्वाक्षरी/-

तारीख : २३/०९/२०२६ श्री. पांडुरंग राऊत (अध्यक्ष व कार्यकारी संचालक)

ठिकाण : पुणे डीआयएन : ००७८६७४६

ADITYA BIRLA CAPITAL HOME LOANS

नोंदणीकृत कार्यालय : इंडियन रेयॉन कंपाऊंड, वेरावल, गुजरात - ३६२ २६६ | (टी) +९१ २२४३५६७१००

(टोल फ्री) १८०० २७० ७००० | सीआयएन : यू६५९२२जीजे२००९पीएलसी०८३७७९ | homefinance.adityabirlacapital.com

शाखा कार्यालय : आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लि., पहिला मजला, लोहिया जैन आर्केड, एस. क्र. १०६, चारतुर्श्रृंगी मंदिराजवळ, सेनापती बापट रोड, पुणे-४११०१६

विक्री सूचना

[सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ मधील नियम ८(६) आणि ९(१)] सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अधिनियम, २००२ ("सरफेसी कायदा") अंतर्गत आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेडकडे तारण असलेल्या स्थावर मालमत्तेची खासगी कराराद्वारे विक्री

खाली सही करणारे **आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (यापुढे "एबीएचएफएल" असे संबोधले जाईल)** चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी खालील स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतलेला आहे : **"गहाण मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड जो, फ्लॅट क्र. ३०६, तिसरा मजला, कार्पेट क्षेत्रफळ ४१५ चौ. फूट म्हणजेच ३८.५९ चौ. मीटर, सर्व्हे क्र. १३५५, 'शांभवी पॅलेस' म्हणून ओळखली जाणारी इमारत, गट क्र. १३५५ (जुना गट क्र. २३४१) असलेल्या जमिनीवर बांधलेली, मौजे वाघोली (अव्हाळवाडी), तालुका हवेली, जिल्हा पुणे, वाघोली, पुणे, महाराष्ट्र-४१२२०७, येथे स्थित आहे."** (यापुढे "**सुरक्षित मालमत्ता**" असे संबोधले जाईल.)

सदर ताबा सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अधिनियम, २००२ (यापुढे "सरफेसी कायदा, २००२" असे संबोधले जाईल) च्या कलम १३(४) अंतर्गत घेण्यात आला आहे.

ही मालमत्ता एबीएचएफएलच्या आर्थिक सुविधेसाठी सुरक्षित करण्यात आली होती. सदर आर्थिक सुविधेअंतर्गत रु. ३२,९०,७२६.०७/- (रुपये बत्तीस लाख नव्वद हजार सातशे सव्वीस आणि सात पैसे फक्त) इतकी थकबाकी तसेच वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावर आकारले जाणारे पुढील व्याज व इतर खर्च हे **कर्जदार/सह-कर्जदार — केतन सोलंकी, अमिता केतन सोलंकी, मेसर्स ऑटोहोम्स (यापुढे "कर्जदार/सह-कर्जदार" असे संबोधले जाईल)** — यांच्याकडून देय आहेत.

सुरक्षित मालमत्तेच्या सार्वजनिक लिलाव/ई-लिलावाचे प्रयत्न निष्फळ ठरल्यामुळे, खाली सही करणारे अधिकारी सरफेसी कायदा, २००२ आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार खासगी कराराद्वारे सदर सुरक्षित मालमत्ता विकून त्यावरील सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी करीत आहेत.

प्राधिकृत अधिकाऱ्यांना वरील सुरक्षित मालमत्ता खरेदी करण्यासाठी एका संभाव्य खरेदीदाराकडून स्वारस्याची अभिव्यक्ती प्राप्त झाली आहे. त्यामुळे प्राधिकृत अधिकारी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८(६) आणि ९(१) नुसार वरील सुरक्षित मालमत्ता खासगी कराराद्वारे विक्री करण्याची ही सूचना देत आहेत. ही विक्री **"जिथे आहे तिथेच", "जशी आहे तशी" आणि "जे काही आहे त्यासह" या तत्त्वांवर १५-१०-२०२६ रोजी किंवा त्यानंतर केली जाईल.** ही विक्री एबीएचएफएलला कर्जदार/सह-कर्जदारांकडून देय असलेल्या **रु. ३२,९०,७२६.०७/- (रुपये बत्तीस लाख नव्वद हजार सातशे सव्वीस आणि सात पैसे फक्त)** रकमेच्या वसुलीसाठी केली जाईल. **सुरक्षित मालमत्तेची राखीव किंमत रु. १८,००,०००/- (रुपये अठरा लाख फक्त) निश्चित करण्यात आली आहे.**

कर्जदार/सह-कर्जदारांना याद्वारे कळविण्यात येते की, सरफेसी कायदा, २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ अंतर्गत आवश्यक सर्व बाबींची पूर्तता करण्यात आली आहे आणि आता एबीएचएफएल सदर नियमांच्या नियम ८(५) मधील तरतुदींनुसार खासगी कराराद्वारे येथे नमूद सुरक्षित मालमत्ता विकून आपल्या सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी करण्याच्या प्रक्रियेत आहे.

तसेच, कर्जदार/सह-कर्जदारांचे लक्ष सरफेसी कायदा, २००२ च्या कलम १३ च्या उपकलम (८) मधील तरतुदींकडे वेधण्यात येत आहे, ज्यामध्ये उपलब्ध कालावधीत सदर सुरक्षित मालमत्ता विमोचित करून परत मिळविण्याची तरतूद आहे.

दिनांक : २३.०९.२०२६ **प्राधिकृत अधिकारी**

ठिकाण : पुणे **आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

जाहीर सूचना

नोंद घ्यावी की, आमचे पक्षकार, महाराष्ट्र राज्यातील पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यात, वारक गावात असलेल्या, मोजमापे 16 हेक्टर 50.75 म्हणजेच 1,65,075 चौरस मीटर जमिनीच्या तुकड्यासंदर्भात विनोदकुमार अग्रवाल, अजय कुमार अग्रवाल, दिनेश महेंद्रकुमार अग्रवाल आणि रामकुमार अग्रवाल यांच्या हक्क, मालकी आणि हितसंबंधांची तपासणी व पडताळणी करत आहेत, सदर या जमिनीसोबतच, लगतच्या मुळशी महामार्गापासून जमिनीपर्यंत जाणारया 12-मीटर-रुंद प्रवेश रस्त्यावरील कायमस्वरूपी येण्या-जाण्याच्या हक्काचीही तपासणी व पडताळणी केली जात आहे, जिचे अधिक तपशीलवार वर्णन खालील रकान्यात दिले आहे

("सदर निर्देशित मालमत्ता"):

अ. क्र.	जमिनीचे वर्णन	जमीनीचे क्षेत्रफळ	अ. क्र.	जमिनीचे वर्णन	जमीनीचे क्षेत्रफळ
1	272/1	02 एच 62 आर	11	274/6	00 एच 15 आर
2	272/3	1 एच 85 आर	12	274/7	00 एच 27 आर
3	272/4	1 एच 35 आर	13	274/8	00 एच 34 आर
4	272/8	68 आर	14	274/10	00 एच6 आर
5	273/7	01 एच 22 आर	15	274/11	00 एच 54 आर
6	273/8	01 एच 54 आर	16	274/12	00 एच 86 आर
7	273/10	00 एच 58 आर	17	274/5	00 एच 14 आर
8	273/12	00 एच 89 आर	18	274/13	00 एच 8.75 आर
9	274/3	00 एच8 आर	19	272/5	00 एच 66 आर
10	274/4	00 एच5 आर	20	272/6	02 एच 54 आर

वरील निर्देशित मालमत्तेविरुद्ध किंवा तिच्या कोणत्याही भागाविरुद्ध किंवा तिच्या कोणत्याही भागाविरुद्ध, वारसा हक्क, गहाण, ताबा, विक्री, देणगी, भाडेपट्टा, धारणाधिकार, बोजा, विश्वस्त निधी, देखभाल, सुखाधिकार, हस्तांतरण, परवाना किंवा इतर कोणत्याही प्रकारे किंवा इतर कोणत्याही हक्काने किंवा कोणत्याही प्रकारच्या हितसंबंधाच्या संदर्भात कोणताही हितसंबंध किंवा विवाद/दावा असलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना, आपले आक्षेप/दावे/विवादांचा तपशील सिद्ध करणारया सहाय्यक कागदोपत्री पुराव्यांसह, पक्षकारांनी सदर या तारखेपासून 14 दिवसांच्या आत, निम्नस्वाक्षरीकार यांना त्यांच्या 302/ए, नित्यानंद कॉम्प्लेक्स, 247/ए बंड गार्डन, कनॉट प्लेस समोर, पुणे - 411 001 या कार्यालयाच्या पत्त्यावर किंवा 18/एबीसी, सूर्य महल, चौथा मजला, 5, बुर्जोरजी भारुचा रोड, काळा घोडा, मुंबई 400001 सदर या कार्यालयाच्या पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवणे आवश्यक आहे. वर नमूद केलेल्या कालावधीत कोणताही दावा, हितसंबंध किंवा विवाद केला गेला नाही किंवा संदर्भित केला गेला नाही, तर आमचा पक्षकार वरील निर्देशित मालमत्तेमधील अशा कोणत्याही कथित दाव्याचा, हितसंबंधाचा किंवा विवादाचा कोणताही संदर्भ न घेता किंवा विचार न करता व्यवहार पुढे चालवेल, आणि तो सर्व हेतूंसाठी सोडून दिला गेला आहे असे मानले जाईल व तो आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही.

सदर दिनांकित 22 सप्टेंबर, 2026.

मालवी रणछोडदास अँण्ड कंपनी

भागीदार

ॲडव्होकेटस अँण्ड सॉलिसिटर